# भंडारा जिल्हा पोलीस वार्तापत्र

जा.क्र. ८२८/माहिती कक्ष/वार्तापत्र
पोलीस अधीक्षक कार्यालय, भंडारा
दिनांक २६/१२/२०१७

**१) मोटार सायकलची चोरी . :–**

दिनांक १८/१२/२०१७ चे ०८.०० वाजता दरम्यान ते दिनांक २४/१२/२०१७ चे २१.०० यातील फिर्यादी मंगेश तुकाराम बोंद्रे वय ३० वर्ष, रा. रुक्मीणी नगर खात रोड भंडारा याने त्याची काळया रंगाची होंडा स्टनर मोटार सायकल क्र. एम.एच. ३६ जे ४३१७ किंमती १५,०००/–रु. ची ही सनी प्लाजा कॉम्प्लेक्स बस स्टॅड जवळ भंडारा येथे ठेवुन कामा निमीत्त पवनी येथे गेला असता परत आला तेव्हा मोटार सायकल ठेवलेल्या ठिकाणी दिसुन आली नाही कोणीतरी अज्ञात चोराने कुणीही नसल्याची संधी साधुन चोरुन नेल्याने फिर्यादी यांचे तोंडी रिपोर्ट पोलीस स्टेशन भंडारा येथे कलम ३७९ भादवी. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास मपोउपनी. आत्राम पोलीस स्टेशन भंडारा हे करीत आहेत.

**२) म.रा.वि.वि. कंपनी ट्रान्सफार्मर मधील फ्युज किटकॅट ग्रिपचीचोरी . . :–**

दिनांक २३/१२/२०१७ चे १२.०० ते २४/१२/२०१७ चे १४.०० वाजता दरम्यान यातील कोणीतरी अज्ञात चोराने म. रा. वि. वि. कंपनी ट्रान्सफार्मर मधील फ्युज किटकॅट(ग्रिप) एकुण किंमती २३००/–रु. चे चोरुन नेल्याने फिर्यादी यांचे लेखी रिपोर्ट पोलीस स्टेशन तुमसर येथे कलम ३७९ भादवी. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा. माहुर्ले पोलीस स्टेशन तुमसर हे करीत आहेत.

**३) अज्ञात ट्रकच्या धडकेत एक जखमी . :–**

दिनांक २४/१२/२०१७ चे १३.०० वाजता दरम्यान यातील जखमी फिर्यादी राकेश दत्तु कोडापे वय ३३ वर्ष, रा. सुयोग नगर पे. पंप ठाणा हा आपले मोटार सायकल क्र. एमएच ३६ एच १६०५ ने भंडारा वरुन पे. पंप मार्गे सुयोग नगर येथे जात असतांना यातील अज्ञात आरोपी ट्रक चालकाने त्याचे ताब्यातील कथ्था रंगाचा आयसर कंपनीचा ६ चाकी ट्रक भरधाव वेगाने, निष्काळजीपने चालवुन फिर्यादीचे मोटार सायकल ओव्हरटेक करतांना मागेहुन धडक दिल्याने जखमी हा रोडवर पडुन त्याचे डोक्याला, तोंडाला व उजव्या हाताला मार लागुन जखमी झाल्याने व अपघाताची सुचना न देता पळुन गेल्याने फिर्यादी राकेश दत्तु काडापे वय ३३ वर्ष रा. सुयोग नगर पे. पं. ठाणा बयान व जखमीचे एमएलसी रिपोर्ट पो. स्टे. भंडारा येथुन टपालाने आज रोजी प्राप्त झाल्याने सरतर्फे फिर्यादी पोहवा. साखरे यांचे रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन जवाहरनगर २७९,३३७ भादवी. सहकलम १८४,१३४/१७७ मोवाका. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा. सोडगीर पोलीस स्टेशन जवाहरनगर हे करीत आहेत.

४) आमरोड वर येणा–या जाणा–या वाहतुकीस व लोकांच्या जिवितास धोका निर्माण होईल अशा स्थितीत वाहन उभी करून मिळून आल्याने गुन्हा नोंद :–

दिनांक २५/१२/२०१७ चे १५.३० वाजता दरम्यान यातील फिर्यादी हे पोलीस स्टॉपसह एनएच ६ रोडने पेट्रोलींग करीत असता धारगाव बस स्थानक समोरील एनएच ६ रोडवर यातील आरोपी चालकाने त्याचे ताब्यातील टाटा मॅजीक ही रहदारीचे रस्त्यावर ऊभे करुन वाहतुकीस अडथळा निर्माण करतांनी मिळुन आल्याने सर तर्फे फिर्यादी पो.शि. हटवार यांचे रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन कारधा येथे कलम २८३ भादंवि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास सफौ. नवखरे पो. स्टे. कारधा हे करीत आहेत.

५) अनोळखी इसमाचा उपचारा दरम्यान मृत्यु . :–

दिनांक २५/१२/२०१७ चे ००.३० वाजता दरम्यान यातील मृतक अनोळखी इसम वय अंदाजे ६५ वयोगटातील हा दिनांक १९/१२/२०१७ पासुन ग्रा. रु. पवनी येथे उपचाराकरीता भरती होता उपचारा दरम्यान तेथील डॉक्टरांनी मृत घोषीत केल्याने डॉ. मेमा. वरुन पो.स्टे. पवनी येथे कलम १७४ जाफौ. अन्वये मर्ग नोंद करण्यात आला. पुढील तपास पोहवा. मनगटे पो.स्टे. पवनी हे करीत आहेत.

६) अवैध दारु अड्डयांवर धाडी . :–

दिनांक २५/१२/२०१७ रोजी भंडारा जिल्हा पोलीसांनी पोलीस स्टेशन कारधा, गोबरवाही, लाखांदुर व वरठी येथे अवैध दारू अड्डयांवर धाडी घालुन एकुण ०५ गुन्हे दाखल करून आरोपीतांच्या ताब्यातुन ५५ लिटर हातभट्टी दारू/११५ किलो सडवा+ साहित्य किंमती १२१५०/–रु. व ३ लिटर ७८० मिली लिटर देशी दारु किंमती १४१०/–रु. असा एकुण किंमती १३५६०/रु. चा माल जप्त करण्यात आला.

७) मोटार वाहन कायदयाखाली कारवाई. :–

दिनांक २५/१२/२०१७ रोजी भंडारा जिल्हा पोलीसांनी मोटार वाहन कायदयाखाली एकुण ७५ प्रकरणांची नोंद करण्यात आलेली असून त्यापैकी तीन सिटर वाहनांवरती– २० केसेस व ईतर वाहनांवरती –५५ केसेस करण्यात आलेले आहे.

26.12

(एस. व्ही. कुलकर्णी )
पोलीस उपअधिक्षक (गृह)
भंडारा
दुरध्वनी.क्र. ९९८७३८५४०५

प्रति,

जिल्हा माहिती अधिकारी, भंडारा

वर्तमान पत्राचे संपादक व जिल्हा प्रतिनिधी यांना उपरोक्त माहीती दैनिक वर्तमान पत्रात प्रसिध्द करण्याकरीता कळविण्यास विनंती आहे.

**प्रत, संगणक कक्ष,** भंडारा यांना भंडारा पोलीस संकेतस्थळावर ठेवण्याकरीता.